# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# मंगळवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२५
## ठळक बातम्या

- **सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करायला राज्यमंत्रिमंडळाची मान्यता.**
- **काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्वीकारला कार्यभार.**
- **उद्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विदर्भात विविध कार्यक्रमांचे आयोजन.**
- **'महापॉवर-पे' पेमेंट वॉलेटला नागपूरकरांची पसंती, जानेवारी महिन्यात ग्राहकांनी भरले 15.14 कोटी.**

मंत्रिमंडळ निर्णय

सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करायला राज्य सरकारनं आज मान्यता दिली. मंत्रालयात झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. हा आयोग १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी शिफारशी करेल. या शिफारशींबाबत अहवाल सादर करण्यास या आयोगाला ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदत असेल. आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या नावाची राज्यपाल यांच्याकडे शिफारस करण्याचे अधिकार मुख्यमंत्री यांना देण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली. सहावा राज्य वित्त आयोग पंचायती आणि नगरपालिका यांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करून विविध बाबींच्या संबंधात शिफारशी करील त्यात राज्याकडून वसूल करण्यात यावयाच्या कर, शुल्क, पथकर आणि फी यांच्यापासून मिळणाऱ्या संविधानाच्या भाग नऊ आणि नऊ-अ अन्वये, पंचायती आणि नगरपालिका यांच्यात विभागून द्यावयाच्या निष्वळ उत्पन्नाची राज्य, पंचायती आणि नगरपालिका यांच्यात विभागणी करणे आणि अशा उत्पन्नाती पंचायती आणि नगरपालिका यांच्या सर्व स्तरांवरील त्यांच्या त्यांच्या हिश्श्यांचे वाटप करणे याचा समावेश असेल.छत्रपती संभाजी महाराजांबद्दल विकिपीडिया या संकेतस्थळावरील चुकीची आणि खोटी माहिती हटविण्याबाबत राज्याच्या साइबर विभागाच्या महासंचालक याना सूचना देण्यात आल्याच

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

***(होल्ड बाईट - फडणवीस ३६ सेकंद)***

***ज्या प्रकारे विकिपीडियावर छत्रपती संभाजीराजे यांच्याबद्दल आक्षेपार्ह लिखाण केला गेलेला आहे. यासंदर्भात महाराष्ट्राचे सायबर विभागाचे  जे प्रमुख आहेत. आई.जी.साइबर यांना मी सांगितलं आहे. की त्याने तात्काळ विकिपीडिया किंवा त्याची संबंधित जी यंत्रणा आहे. त्यांच्याशी बोलणी करावी आणि त्यांना ते हटवून देण्याकरता  त्याठिकाणी ठिकाणी सांगावं, जी काही प्रक्रिया त्याकरता करावे लागते ती प्रक्रिया करावी. अशाप्रकारचे आक्षेपार्ह लिखाण हे ओपनसोर्सवर अशा पद्धतीने राहणं हे अतिशय चुकीचा आहे. त्यामुळे ते तिथन निघाला पाहिजे. याद्दष्टीने सगळी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.***

हर्षवर्धन सपकाळ

काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईतील टिळक भवनमध्ये मावळते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडून अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी कॉंग्रेसचे प्रभारी रमेश चेनिथला, विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार, मुकुल वासनिक यांच्यासह काँग्रेसचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला कॉंग्रेसच्या नेतृत्वाने प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली, विश्वास दाखवला याचा आनंद आहे...

***(होल्ड बाईट - सपकाळ २६ सेकंद)***

***येणारा काळत ही जबाबदारीचा जाण आणि भान ठेवून ज्या  शक्ति आज  या देशाला तोडू पाहत आहे. नव्हे नव्हे तर या देशात एक अवसाद लढवण्याची एक फारच  गंभीर चित्र निर्माण केलेला आहे. या जातीवादी शक्तीच्या विरोधात मी दोन हात सामना करेल आणि काँग्रेसची विचारधारा पुढे घेऊन जाईल या याकरता मी कटिबद्ध असल्याचा संकल्पदेखील आपल्या सगळ्यांच्या साक्षीने आणि माझ्या नेतृत्वाच्या समोर मी ती ग्वाही  आपल्या सगळ्यांना देतो.***

यावेळी मावळते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, आज निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम भाजपच्या नेतृवातील सरकार करत आहे. आमच्यापुढे लोकशाही वाचवण्याचे आव्हान आहे. आम्ही सार्वजण

हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात काम करून लोकांमध्ये जागृती करणार आहे. यावेळी रमेश चेनिथला यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

ज्ञानेश कुमार

देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी, निवडणूक आयोगाचे सध्याचे सदस्य, ज्ञानेश कुमार यांची नेमणूक झाल्याचं केंद्रीय विधी मंत्रालयाने जाहीर केलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्तपदाच्या नेमणुकी विषयीचा नवा कायदा लागू झाल्यानंतरची ही पहिलीच नेमणूक आहे. नवीन कायद्यानुसार नियुक्ती समितीची बैठक काल नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, बैठकीला उपस्थित होते. निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीविषयी सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेचा निकाल लागेपर्यंत नवीन आयुक्तांची नेमणूक लांबणीवर टाकावी अशी मागणी राहुल गांधी यांनी बैठकीत मांडली. ज्ञानेश कुमार भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८८च्या तुकडीतले केरळ कॅडरचे अधिकारी असून त्यांच्याकडे केरळ राज्यशासन तसंच संरक्षण, संसदीय कार्य, आणि सहकार मंत्रालयात काम करण्याचा अनुभव आहे. देशाचे २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ते उद्या कार्यभार स्वीकारतील.

परीक्षा पे चर्चा

परीक्षा पे चर्चा 2025 चा नवीन भाग आज प्रसारित करण्यात आला आहे. यामध्ये विविध परीक्षा मंडळांच्या परीक्षेत प्रथम आलेले यशस्वी विद्यार्थी आपले अनुभव सांगितले. तसच परीक्षा काळात चिंता, तणाव यांचा यशस्वीपणे सामना कसा करावा याबाबत आपले अनुभव या यशस्वी विद्यार्थ्यांनी सांगितले. परीक्षेला सामोरे जाताना मनात भीती ठेऊ नये असे सहभागिनीं सांगितले

***(होल्ड बाईट - सहभागी १० सेकंद)***

***I think whenever we hear about an exam, we are engulfed with a wave of fear. We should not think of what questions will come. We should focus on our preparation and have faith on it.***

सदर विद्यार्थ्यांमध्ये संघ लोकसेवा आयोगाच्या 2022 च्या परीक्षे मधल्या टॉपर इशिता किशोर यांनी मार्गदर्शन केलं

जी किशन रेड्डी

केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी.किशन रेड्डी यांनी नुकतेच नागपूरच्या वाडी इथल्या जेएनएआरडीडीसी अर्थात जवाहरलाल नेहरू अल्यूमिनियंम संशोधन, विकास आणि रचना केंद्राला भेट दिली आणि तिथल्या उपक्रमांचा आढावा घेतला. त्यांनी कोळसा प्रयोगशाळेसाठी आयसीपी-एमएस (क्रिटिकल मिनरल अँड आरईई लॅब) आणि मॅक्रो टीजीए या दोन नवीन संशोधन सुविधांचे उद्घाटन केले. त्यांनी जेएनएआरडीडीसीचे संचालक डॉ. अनुपम अग्निहोत्री यांच्यासमवेत वृक्षारोपण कार्यक्रमातही त्यांनी भाग घेतला.यावेळी बोलताना त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाने अलीकडेच मंजूर केलेल्या राष्ट्रीय क्रिटिकल मिनरल मिशन (एनसीएमएम) बद्दल प्रकाश टाकला. या मोहिमेअंतर्गत खनिजांचा दीर्घकालीन शाश्वत पुरवठा सुनिश्चित करणे आणि खनिज उत्खनन आणि खाणकामापासून ते शेवटच्या उत्पादनांमधून लाभ, प्रक्रिया आणि पुनर्प्राप्तीपर्यंतच्या सर्व टप्प्यांचा समावेश असलेल्या भारताच्या क्रिटिकल मिनरल व्हॅल्यू चेन मजबूत करणे हे उद्दिष्ट आहे, असे ते म्हणाले.

संघ लोकसेवा आयोग

संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा आणि वनसेवेच्या पूर्व परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख 21 फेब्रुवारी पर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती संघ लोकसेवा आयोगाने समाज माध्यमाद्वारे दिली आहे. केंद्र शासनाच्या विविध विभागांमध्ये तसेच वनविभागामध्ये अधिकारी पदासाठी घेतल्या जाणाऱ्या या पूर्व परीक्षेची तारीख 25 मे 2025 आहे.

शिवाजी महाराज जयंती

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जयंती उद्या 19 फेब्रुवारीला साजरी करण्यात येणार असून त्यानिमित्ताने सर्वत्र विविध कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. नागपूर शहरात ‘जय शिवाजी -जय भारत’ पदयात्रेचे आयोजन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. पदयात्रेचा शुभारंभ सकाळी 7 वाजता सक्करदरा चौक येथील राजे रघुजी भोसले महाराज स्मारक येथून होणार आहे.

या ऐतिहासिक व राष्ट्रभक्तीपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह सामाजिक संस्था, क्रीडा संघटना,लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्यने सहभाग होणार आहे. ही पदयात्रा राज्याच्या सर्व जिल्हयांमध्ये आयोजिण्यात आली आहे. नागपुरात पदयात्रेचा शुभारंभ सक्करदरा चौक येथील राजे रघुजी भोसले महाराज स्मारक येथून होणार आहे. ही पदयात्रा गजानन चौक (जुनी शुक्रवारी) मार्गे केशव द्वार चौक, रेशीमबाग चौक, सी.पी. अँड बेरार चौक, कोतवाली चौक, गांधी गेट चौक या मार्गाने जाणार आहे. यादरम्यान मल्लखांब, दांडपट्टा, कुस्ती, जिम्नॅस्टिक,जम्प रोप, रोप या खेळाचे प्रात्यक्षिके सादर करण्यात येणार आहे. शिवजयंतीचे औचित्य साधून उद्या सकाळी 11 वाजता नागपूर महावितरणच्या विद्युत भवन कार्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात उद्या सकाळी १०.३० वाजता व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. याशिवाय रक्तदान, नेत्र तपासणी, दंत तपासणी, त्वचा व केसांसंबंधीत उपचार शिबिराचे आयोजन २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ पर्यंत करण्यात आले आहे. वाशीम जिल्हा प्रशासनाच्या वतीने उद्या 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रा आणि विविध कार्यक्रमात शिवाजी महाराज यांच्या जिवनावर नाट्य, पोवाडे, वेशभुषा, वकृत्व, लेझीम, लाठीकाठी, दांडपट्टा यांचे प्रदर्शन यांचा समावेश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सकाळी 8.30 वाजता पदयात्रेला संबोधित करणार आहे. अकोला जिल्हा क्रीडा संकुल येथे कार्यक्रमस्थळी स्क्रीनवर संबोधन पाहता येणार आहे.

महापॉवर-पे

वीज बिल भरणे सोयीचे करणाऱ्या, तसेच छोट्या व्यावसायिकांना उत्पन्न मिळवून देणाऱ्या महावितरणच्या 'महापॉवर-पे' पेमेंट वॉलेटला नागपूर जिल्हयातील वीज ग्राहकांनी पसंती दिली आहे. जानेवारी महिन्यांत दोन हजार 382 वीज ग्राहकांनी या वॉलेटच्या माध्यमातून 15 कोटी 14 लाख 94 हजार रुपयांच्या वीज बिलांचा भरणा केला आहे.

******